राष्ट्रकुटकालीन जैन धर्म एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविज्ञान विद्याशाखेअंतर्गत ‘इतिहास’ विषयातील पीएच.डी. पदवी साठी सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

: संशोधक:

विनायक दिलीप हिरे

: संशोधन मार्गदर्शक:

डॉ. अनिल मुरलीधर कठारे

प्रोफेसर, संचालक व विभाग प्रमुख
पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र
श्री शिवाजी कॉलेज, कंधार
ता. कंधार जि. नांदेड

मे

2019

राष्ट्रकूटकालीन जैन धर्म एक अभ्यास

मानवी नागरीकरणापासून ते आजतागायत मनुष्य हा कोणत्या ना कोणत्या धर्माचा अनुयायी आहे. उत्क्रांतीच्या काळापासून मनुष्याला स्थिर अवस्था प्राप्त झाल्यापासून ते हडपा संस्कृती पर्यंत तसेच नागरी जीवनापर्यंत मनुष्य हा निसर्गपूजक होता. तो नैसर्गिक शक्तींना देव मानून त्यांची पूजा करीत असे. हडप्पा काळातील लोकही निसर्गपूजक होते. दुसऱ्या नागरीकार्नापुर्वीच्या कालखंडात भारताच्या उत्तरेत वैदिक सहितांची निर्मिती होऊन दुसऱ्या नागरीकरणाच्या कालखंडात वैदिक धर्माचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. यातून वेदातील कर्मकांडांच्या अतिरेकामुळे इ. स. पुर्व सहाव्या शतकात काही नवीन धर्म-पंथ स्थापन झाले तर काही जुने धर्म प्रसिद्धीस आलेले दिसतात. या धर्म पंथांमध्ये बौद्ध, जैन, शैव व वैष्णव धर्मसारखे असे 62 धर्म सांप्रदाय उदयास आलेले दिसतात. या धर्मांनी आपल्या धर्माच्या मर्यादा शिथील करून धर्माचा प्रसार केलेला दिसतो. या धर्मा मध्ये अनेक धर्मांना राजाश्रय मिळाल्यामुळे धर्माचा प्रचार प्रसार सुरू झालेला दिसतो. यामध्ये प्रामुख्याने बौद्ध व जैन धर्माचा प्रसार मोठया प्रमाणात झालेला दिसतो. याच धर्मांनी आपले अस्तित्व कायम ठेवलेले दिसते. या धर्मांना मिळालेला राजाश्रय व राज्यकर्त्यांनी केलेला धर्माचा प्रचार प्रसार यांचा अभ्यास आपण या प्रकरणातून करणार आहे.

अशोकाने बौद्ध धर्माचा केलेला स्वीकार व त्याचा केलेला प्रचार अणि प्रसार यातून बौद्ध धर्माची विकास अवस्था दिसून येते. तसेच इतर धर्माचेही दिसून येते. अशाच प्रकारचे राजाश्रय हे जैन धर्मालाही मिळालेले दिसून येतात. बौद्ध धर्माला मिळालेल्या प्रसिद्धी पेक्षा जैन धर्माला कमी प्रमाणात प्रसिद्धी मिळाली असली तरी जैन धर्म आपले अस्तित्व कायम टिकवून होता.

उत्तरेत बौद्ध व जैन धर्मांना राजघराण्यांनी दिलेल्या राजाश्रयामुळे दक्षिणेतील राजघराण्यांवर या धर्माचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते. या दक्षिणेतील राजघराण्यांमध्ये गंग, चालुक्य, पल्लव, चोल, शिलाहार, राष्ट्रकूट व कल्चुरी इत्यादी राजांनी जैन धर्माला आश्रय दिला. या धर्मांना राजघराण्यांनी मोठया प्रमाणावर

राजाश्रय दिलेला दिसतो. सुरुवातीच्या काळात या भागावर जैन धर्माला थोड्या फार प्रमाणात राजाश्रय मिळाला. दक्षिणेतील जैन धर्माच्या विकासात इ. सनाच्या 5 व्या ते 6 व्या शतकात व इ.स 7 व्या ते 9 व्या शतकात जैन धर्माची मोठ्या प्रमाणात भरभराट झालेली दिसते. ते म्हणजे येथील राजघराण्यनी दिलेल्या राजाश्रयामुळे होय. या राजघराण्यांपैकी सर्वात जास्त भरभराट ही राष्ट्रकूट राजांनी जैन धर्माला दिलेल्या आश्रयामुळे होय. राष्ट्रकूटांनी दिलेल्या आश्रयामुळे जैन धर्माचा विकास व प्रचार अणि प्रसार घडून आला. सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माला मोठ्या प्रमाणात दिलेल्या राजाश्रयामुळे बौद्ध धर्माचा विकास व प्रचार अणि प्रसार झालेला दिसतो. राष्ट्रकूट राजांनमध्ये विशेषत अमोघ वर्षे, कृष्ण व्दितीय, इंद्र तृतीय, इंद्र चतुर्थ यांनी जैन धर्म स्विकारुन या धर्माचे अनुयायी झालेले दिसतात. राष्ट्रकूटांच्या धार्मिक धोरणाचा अभ्यास केला असता आपणास असे दिसून येते की, राष्ट्रकूट राजे हे धर्म सहिष्णू होते. विशेष म्हणजे राष्ट्रकूटानी मुस्लिम धर्मालाही आपल्या समाज व्यवस्थेत सामावून घेतलेले दिसते यावरून त्यांचे धर्म सहिष्णुतेचे धोरण स्पष्ट होते. संशोधनाच्या दृष्टिकोनातून विचार केला असता, राष्ट्रकूटांनी जैन व इतर धर्मियांसाठी अनेक दान दिल्याचे उल्लेख आपणास साहित्य, शिलालेख व ताम्रपटातुन दिसते. राष्ट्रकूट राजांच्या धार्मिक धोरणावर कमी प्रमाणात प्रकाश पडलेला दिसतो. या संशोधन प्रबंधातुन आपणास राष्ट्रकूट कालीन धार्मिक परिस्थिती, राष्ट्रकूट राजांचे धार्मिक धोरण यावर प्रकाश टाकावयाचा आहे.

- **विषय निवडीचा उद्देश**

प्राचीन भारतीय इतिहासाचा अभ्यास केला असता आपणास असे दिसून येते की, दक्षिण भारतातील प्रसिद्ध व प्रभावी राजघराणे म्हणजे राष्ट्रकूट घराणे होय. या राज्यकर्त्यांनी आपल्या प्रजेला कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला दिसत नाही. तसेच त्यांना धर्माचरणाची मुभा होती यावरून राष्ट्रकूट राजांचे धर्म सहिष्णुतेचे धोरण स्पष्ट होते. राष्ट्रकूट राजानी आपल्या कारकीर्दीत जैन, बौद्ध व हिंदू धर्म या बरोबरच मुस्लीम धर्मालाही आपल्या समाज व्यवस्थेत सामावून घेतले यावरून त्यांचा धर्मातील उदारपणा स्पष्ट दिसतो. राष्ट्रकूट काळात जैन धर्म आपल्या परमोच्च शिखरावंर होता

तर बौद्ध धर्माला उतरती कळा लागली तर हिंदू धर्म आपले अस्तित्व टिकवून होता. या राष्ट्रकूट राजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक जैन मुनी व आचार्य याना मोठ्या प्रमाणावर संरक्षण व आश्रय दिला. राष्ट्रकूट राजे हे जैन धर्माचे अनुयायी होते. या काळात जैन धर्माचा झालेला प्रसार आणि या धर्माचा इतर समकालीन घराण्यांवर झालेला प्रभाव याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

- **संशोधनाची गृहीतके**
  - राष्ट्रकूट घराण्याने इ.स. ७५७ ते इ.स. ९७४ पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले राष्ट्रकूटांची राजधानी मान्यखेट होती यावरून यांना मान्यखेटचे राष्ट्रकूट या नावाने ओळखले जाते.
  - राष्ट्रकूट घराण्यामध्ये अनेक कर्तबगार राजे होऊन गेले त्यापैकी अमोघवर्ष प्रथम, कृष्ण पहिला, गोविंद तिसरा, कृष्ण तिसरा, इंद्र तृतीय, इंद्र चतुर्थ या राजांच्या कारकीर्दीत जैन धर्माचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.
  - मराठवाड्यातील वेरूळ, कंधार, आंध्र प्रदेशातील बोधन, कर्नाटकातील मान्यखेट या राष्ट्रकूट राजघराण्याच्या राजधानी व उपराजधानी होत्या. वेरुळ ही त्यांची प्रारंभिक राजधानी होती. तर कृष्ण तिसरा याच्या काळात कंधार ही राष्ट्रकूटांची राजधानी होती.
  - राष्ट्रकूट राजघराणे मूळ मराठवाड्यातील लत्लुर म्हणजेच लातूरचे होते.
  - जैन धर्म हा एक प्राचीन धर्म असून त्याचा उदय हा वैदिक काळात झाला असे मानले जाते. पण या धर्माचा विकास जैन तीर्थंकर महावीर यांच्या काळात झालेला दिसतो.
  - जैन धर्माचे तत्त्वज्ञान आचरणास कठीण असले तरी मानावी जीवनास ते फार उपयोगी होते.
  - प्राचीन भारतीय इतिहासात संस्कृती व मानवी समाजावर जैन धर्माचा मोठया प्रमाणावर प्रभाव निर्माण झालेला होता.

- राष्ट्रकूट राजांनी जैन धर्म व साहित्यिकांना आश्रय दिला. त्यामुळे या काळात जैन साहित्याचा मोठ्या प्रमाणावर विकास झालेला दिसतो.
- राष्ट्रकूट राजघराण्यातील काही राजे जैन साहित्यिक होते. त्यांनी जैन साहित्यांची निर्मिती केली. उदा. अमोघवर्ष पहिला याने संस्कृत मध्ये प्रश्नोत्तररत्नमालिका व कानडी भाषेत कविराजमार्ग या ग्रंथाची रचना केली.
- राष्ट्रकूट राजांनी अनेक शिलालेख व ताम्रपट कोरले या काळातील बहुसंख्य शिलालेख कानडी व संस्कृत भाषेत आढळतात.
- राष्ट्रकूट घराण्याच्या काळात दक्षिण भारतात कला व स्थापत्य क्षेत्रात भरीव स्वरूपाची प्रगती झाली.
- राष्ट्रकूट कालातील पुरावशेष भारतात आढळून येत असले तरी महाराष्ट्रातील मराठवाडयातील वेरूळ, कंधार, लातूर परिसर येथे मोठया़ प्रमाणावर आढळतात.
- कंधार ही राष्ट्रकूटंची राजधानी असल्यामुळे मराठवाडयातील कंधार येथे या काळातील पुरातत्वीय अवशेष आढळतात.
- वेरूळ या ठिकाणी अखंड डोंगरात खोदण्यात आलेले कैलास मंदिर हा कलेचा उत्तम नमुना आहे, तसेच येथील घृष्णेश्वर मंदिर स्थापत्याचा उत्तम नमुना ठरतो.

- **संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधन विषयात पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

- राष्ट्रकूटांच्या राजकीय इतिहासाचा थोडक्यात आढावा घेणे.
- जैन धर्माच्या उदय व विकासाची माहिति घेऊन जैन धर्माच्या तत्वज्ञानाचा आढावा घेणे.
- राष्ट्रकूट कालीन जैन धर्माच्या विकासाचा व प्रभावाचा आढावा घेणे.
- राष्ट्रकूट कालीन साहित्य व साहित्यिकांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.
- राष्ट्रकूट काळातील ताम्रपटांचा अभ्यास करणे.

- राष्ट्रकूट काळातील कला व स्थापत्यांचा आढावा घेणे.
- राष्ट्रकूट काळातील पुरावशेष मंदिर स्थापत्य, गुहा स्थापत्य, आणि मूर्ती शिल्पांचा अभ्यास करणे.
- राष्ट्रकूटांच्या समकालीन घरांनी व त्यांच्यावर जैन धर्माच्या पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.
- राष्ट्रकूट व समकालीन राजघराण्यांनी जैन धर्माला दिलेल्या राजाश्रयामुळे या काळात जैन धर्माची भरभराट झाली. यांचा सविस्तर अभ्यास करणे.
- राष्ट्रकूट राजे व त्यांच्या दरबारी असलेले जैन आचार्य व त्यांचे साहित्य यावर प्रकाश टाकणे.

- **संशोधनाची आवश्यकता**

प्राचीन भारतीय इतिहासात अनेक राजघराण्यांनी साम्राज्यविस्तारा बरोबर धर्मविस्तारालाही प्राधान्य दिले. इ.स.पू ६ व्या शतकातही नव्याने सुरू झालेला बौद्ध धर्म व प्रसिद्धीस पावलेला जैन धर्म हे महत्वाचे होत. या दोन्ही धर्मांना मोठ्या प्रमाणात राजाश्रय मिळाला. बौद्ध धर्माच्या तुलनेत जैन धर्माला कमी प्रमाणात मिळालेला दिसतो. तरीही या धर्माने आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले दिसते. इसवी सनाच्या सुरवातीपासून ते इ.स.च्या ६ व्या शतकापर्यंत जैन धर्म अनेक राजघराण्यांच्या आश्रयाला होता. पण या धर्माला पाहिजे तशी प्रसिद्धी मिळाली नाही. तर राष्ट्रकूट काळात जैन धर्माला मिळालेल्या राजाश्रयामुळे हा धर्म राष्ट्रकूट काळात मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीस आला. राष्ट्रकूट राजांच्या आश्रयामुळे जैन धर्म आपल्या प्रगतीच्या परमोच्च शिखरावर होता. या राष्ट्रकूट घराण्याच्या काळात प्रगतीच्या शिखरावर असलेल्या या धर्माचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

- **संशोधन पद्धती**

राष्ट्रकूट कालीन जैन धर्म एक अभ्यास या संशोधन विषयासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहे संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम संशोधनाचा उपयोग करून संदर्भ पद्धतीचाही उपयोग करणार आहे. राष्ट्रकूट कालीन जैन धर्माच्या अभ्यासासाठी

सर्वेक्षण पद्धतीचाही उपयोग करणार आहे. राष्ट्रकूट राजांनी आपल्या कालखंडात अनेक जैन आचार्यांना आश्रय, दान व अनेक मंदिरे स्थापन केली. धार्मिक क्षेत्रात राष्ट्रकूटाचे महत्त्वाचे योगदान असल्यामुळे यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

- **संशोधन विषयाचे महत्व**

दक्षिण भारतातील राजघराण्यांनी अनेक धर्माना राजाश्रय दिलेला दिसतो. विशेषतः हिंदू, बौद्ध व जैन धर्म हे विशेष होत. इस ७ व्या ते ९ व्या शतकात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, माळवा, मध्य प्रदेश व राजस्थान चा काही भाग या भूप्रदेशावर राज्य करणारे राष्ट्रकूट घराणे हे एक बलाढय़ साम्राज्य होते. याच राजघराण्याने आपल्या कारकिर्दीत जैन धर्माला मोठ्या प्रमाणावर राजाश्रय दिला. व या पैकी काही राजे स्वतः जैन धर्माचे अनुयायी असल्यामुळे यांनी मोठय़ा प्रमाणावर जैन धर्मासाठी अनेक मंदिरे बांधली. लेणी कोरल्या तसेच शिलालेख व ताम्रपट यातून दान ही दिले. याच काळात मोठय़ा प्रमाणावर साहित्य निर्मिती ही झाली. उदा. महावीराचार्य यांनी गणितसारसंग्रह, जीनसेन याने आदिपुराण अमोघवर्षाने प्रश्नोत्तररत्नमालिका व कविराजमार्ग या ग्रंथाची रचना केलेली दिसते. या सर्व साहित्याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रकूट व जैनांची अनेक साधने अप्रकाशित आहेत ही साधने प्रकाशात आणणेही तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

- **पूर्व संशोधनाचा आढावा**

`**राष्ट्रकूट कालीन जैन धर्म एक अभ्यास**` या संशोधन विषयाच्या अनुषंगाने विचार केला असता. राष्ट्रकूटांच्या अभ्यासासाठी अनेक ग्रंथ उपलब्ध असून वरील विषयाच्या अनुषंगाने यावर स्वतंत्र असा ग्रंथ अद्याप तरी तयार झाला नसून सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथांमध्ये राष्ट्रकूट कालीन धार्मिक धोरणावर विशेषतः जैन धर्मावर खूप कमी प्रमाणात माहिती मिळते. अद्याप तरी या विषयावर काम कमी प्रमाणात झाले असून यावर काम करण्याची गरज आहे. **2015 रोजी जीवाजी विद्यापीठ ग्वाल्हेर येथील राघवेंद्र सिंह राठोर यांनी राष्ट्रकूटांवर प्रबंध सादर केला त्यांचा प्रबंधाचा विषय राष्ट्रकूट नरेश और उनका युग** असा असून त्यांनी आपल्या प्रबंधात राष्ट्रकूट राजांची विस्तीर्ण माहिती दिली असून

धर्माविषयी अत्यंत त्रोटक माहिती यात दिसते यामध्ये वर सादर केलेल्या विषयाकडे दुर्लक्ष झालेले दिसते.

- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

राष्ट्रकूट राजवंशाने इ स ७ वे ते ९ वे शतक या प्रदीर्घ कालखंडात दक्षिण भारतातील व उत्तरेतील काही भागावर आपले वर्चस्व निर्माण केले. व या राजांनी उत्तरेत कनौज तर दक्षिण मध्ये कांचीपुरम पर्यत आपले आधिपत्य निर्माण केलेले दिसते. आधुनिक काळातील यांच्या भौगोलिक मर्यादेचा विचार केला असता यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश मध्यप्रदेश या राज्यांचा समावेश होत असून राष्ट्रकूट कालीन जैन धर्म एक अभ्यास या विषयासाठी राष्ट्रकूटांची राजधानी मालखेड [मान्यखेट] व दुसरी राजधानी कंधार या दोन राजधान्यांचा व महाराष्ट्र या राज्याचा विशेष संदर्भ घेऊन या शोध प्रबंधाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

- **नकाशे प्रकरण पहिले**

प्रास्ताविक

'**प्रास्ताविक**' हे शोध प्रबंधातील पहिले प्रकरण आहे. या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन निवडीचा उद्देश, संशोधनाची गृहीतके, उद्दिष्टे, आवश्यकता, महत्व, संशोधन पद्धती, पूर्व संशोधनांचा आढावा, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, आणि संदर्भ साधनांचा सविस्तर आढावा व राष्ट्रकूट राजांचा राजकीय इतिहासाचा सविस्तर आढावा ह्या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

जैन धर्माचा उदय विकास व तत्वज्ञान

'जैन धर्माचा उदय, विकास व तत्वज्ञान' हे या शोध प्रबंधातील दुसरे प्रकरण आहे. जैन धर्माच्या उदयाची पार्श्वभूमी पाहणार असून पाहिले जैन तीर्थंकर वृषभदेव मुनी यांच्या पासून ते शेवटचे तीर्थंकर महावीर पर्यत जैन धर्माच्या विकासाचा आढावा यामध्ये घेणार आहे. या जैन तीर्थंकरांनी जैन धर्माच्या प्रचारासाठी श्रावक आणि श्राविक यांना धर्मातील आचरणासाठी काही नियम व तत्व घालून दिले. उदा. पार्श्वनाथ यांचा चातुर्याम व महावीरांचे पंचआणू व्रते. या प्रकरणामध्ये आपण जैन धर्माच्या उदय, विकास व तत्वज्ञान यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

राष्ट्रकूटकालीन जैन धर्माचा प्रभाव

'राष्ट्रकूट कालीन जैन धर्माचा प्रभाव' हे शोध प्रबंधातील तिसरे प्रकरण आहे. या प्रकरणात दक्षिण भारतातील प्राचीन इतिहासात राष्ट्रकूट घराण्याच्या पूर्वीच्या कालखंडात जैन धर्माची विकास अवस्था पाहणे गरजेचे ठरते. या जैन आचार्यांना अनेक राजघराण्यांनी आश्रय दिला. व हा धर्म टिकून राहीला. एका बलाढ्य साम्राज्याने स्विकारलेला धर्म व त्याचा केलेला प्रचार आणि प्रसार व या साम्राज्याच्या अंकित (मांडलिक) राजावर या धर्माचा झालेला प्रभाव याचा अभ्यास करणार असून राष्ट्रकूटांच्या समकालीन असणारी घराणी उदा. गंग,

शिलाहार, चोल, चालुक्य, कल्चुरी इत्यादी राजघराण्यावर जैन धर्माचा पडलेला प्रभाव यांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

प्राचीन भारतीय इतिहासात ज्ञात असणारी राज्यकर्ती घराणी व या घराण्यावर धर्माचा प्रभाव हा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. या राज्यकर्त्या घराण्यांनी मोठ्या प्रमाणावर धर्म प्रचारकांना आश्रय दिला. व यांनी केलेल्या या प्रचार प्रसाराचा प्रभाव सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, या घटकांवर पडणे स्वाभाविक होते. उदा. अमोघवर्ष याने आपल्या दरबारी गुणभद्र नावाच्या आचार्यावर राजकुमाराच्या शिक्षणाची जबाबदारी सोपवली यातून राजकीय प्रभाव दिसून येतो. या प्रकरणात आपण राष्ट्रकूट कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक या घटकांवर पडलेल्या प्रभावाचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

जैन धर्माचे आश्रयदाते, साहित्य व साहित्यकार

'**जैन धर्माचे आश्रयदाते , साहित्य व साहित्यकार**' हे या शोध प्रबंधातील चौथे प्रकरण आहे. या प्रकरणात राष्ट्रकूट राजे व त्यांच्या कारकिर्दीत तयार झालेले साहित्य आणि साहित्यकार यांची माहिती घेण्यात येणार आहे. राष्ट्रकूटांपुर्वी जैन धर्माची आश्रयदाती घरांणी, त्यांचे साहित्य व साहित्यकार यांचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे. प्राचीन भारतीय इतिहासात आपण अनेक राजघराणी पाहतो. या मध्ये मगध-मौर्या पासून ते दक्षिणेतील चोल, चेर, पांड्य, गंग, पल्लव, चालुक्य, कल्चुरी पर्यंत अनेक राजकर्त्याच्या दरबारी अनेक कलाकार आश्रयास असलेले दिसतात. त्यांच्या या कलागुणांमुळे समकालीन राजांची त्यांच्यावर विशेष मर्जी असे व या कलाकारांमध्ये नृत्य, स्थापत्य, शास्त्रकार, गायक, साहित्यकार इत्यादीचा भरणा असे. दक्षिण भारतातील एक बलाढ्य साम्राज्य म्हणुन उदयास आलेले राष्ट्रकूट घराणे हे ही या मध्ये मागे नव्हते. या प्रकरणात आपण राष्ट्रकूट राजांची वंशावळ व राजांची माहिती पाहणार आहे. या राजांच्या कारकीर्दीतील जैन साहित्यकार व त्यांचे साहित्य याचा अभ्यास करणार आहे. या राजघराण्यात अनेक राजे होऊन गेले. त्यामध्ये काही राजे स्वतः जैन व साहित्यकार होते. यामध्ये **अमोघवर्ष प्रथम** याचे नाव महत्वाचे ठरते. तो स्वतः एक साहित्यकार असून त्याने **कानडी** भाषेत **कविराजमार्ग** या ग्रंथाची रचना केली व **संस्कृत** मध्ये **प्रश्नोत्तररत्नमालिका** या ग्रंथाची रचना केलेली दिसते.

त्याच्या दरबारी **गुणभद्र**, **जीनसेन**, **महावीराचार्य** सारखे विद्वान आचार्य होते. व राष्ट्रकूट राजांच्या नंतर जैन धर्माला राजाश्रय देणाऱ्या घराण्यांची माहिती घेण्यात येणार आहे. या प्रकरणामध्ये राष्ट्रकूट राजांच्या पूर्वी व त्यानंतर तयार झालेले साहित्य यामध्ये कानडी व संस्कृत भाषेव्यतिरिक्त इतर भाषेतील साहित्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

राष्ट्रकूटकालीन शिलालेख व ताम्रपट

'राष्ट्रकूटकालीन शिलालेख व ताम्रपट' हे या शोध प्रबंधातील पाचवे प्रकरण आहे. भारतीय इतिहासात अभिलेख परंपरा ही अत्यंत प्राचीन असून इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापासून म्हणजे मौर्य घराण्यापासून ही परंपरा आपणास दिसते. नंतरच्या काळात राजघराण्यांनी या परंपरेचा उपयोग केलेला दिसून येतो. दक्षिण भारतीय इतिहासातही अभिलेख परंपरा दिसून येते राष्ट्रकूट राजांनी ही मोठ्या प्रमाणावर शिलालेख कोरलेले दिसतात. दानाचे उल्लेख म्हणुन तांब्याच्या पत्र्यावर मजकूर कोरण्यास सुरवात झाली. या तांब्याच्या पत्र्याला ताम्रपट असे म्हणत या ताम्रपटातून राजांच्या अनेक दानाचे उल्लेख मिळतात. यामध्ये आपणास राष्ट्रकूटांनी जैन धर्माला दिलेला आश्रय व या आश्रयातून दिलेली दाने यांचे उल्लेख आपणास शिलालेख, ताम्रपट व मूर्तीच्या पट्टीकांवरही जैनांचे लेख सापडतात. उदा. **परभणी येथे मिळालेल्या एका ताम्रपटात कृष्ण तिसरा याचा मंडलिक चालुक्य राजा अरीकेसरीन तृतीय याने कवी सोमदेव याला एका जैन मंदिराची व्यवस्था लावण्यासाठी एका गावाचे दान देण्यात आले.** या प्रकरणात आपण राष्ट्रकूटांचे, त्यांचे मंडलिक राजघराणी व सामान्य लोकांनी दिलेल्या दानाचे शिलालेख व ताम्रपट यांच्या प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

जैन कला व स्थापत्य

'जैन कला व स्थापत्य' हे शोध प्रबंधातील सहावे प्रकरण आहे. या प्रकरणात राष्ट्रकूटकालीन जैन कला व स्थापत्य यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये मूर्ती, व वास्तूंचा अभ्यास करण्यात येणार आहे राष्ट्रकूट कालीन वास्तूं मध्ये दुर्ग, मंदिर, गुहा

स्थापत्य आणि मूर्तीशास्त्रात मूर्तिकला, व मूर्तीशिल्प यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. राष्ट्रकूट राजांनी जैन धर्माला दिलेल्या राजाश्रयामुळे या धर्माची भरभराट झाली. राष्ट्रकूट राजांनी धर्माला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक गुहा, मंदिरे, व जैन तीर्थंकराच्या मूर्ती ही तयार केलेल्या दिसून येतात. राष्ट्रकूट राजांनी तयार केलेल्या या स्थापत्याची माहिती या प्रकरणात अभ्यासणार आहे. यामध्ये राष्ट्रकूटांनी महाराष्ट्रातील मराठवाड्यातील कंधार, वेरूळ लेणी व पुण्यातील पाताळेश्वर लेणी ही राष्ट्रकूट कालीन आहे. राष्ट्रकूटांनी तयार केलेली शिल्पे यांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे

उपसंहार

'उपसंहार' हे या शोध प्रबंधातील सातवे आणि शेवटचे प्रकरण आहे. या प्रकरणात संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडण्यात येणार आहे.

- **परिशिष्ट**

प्रस्तुत संशोधनात आधारभूत असणारे नकाशे व फोटोग्राफ इतर परिशिष्टात जोडण्यात येणार आहे.

संदर्भ साधने

मराठी ग्रंथ

- गोखले शोभना, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने. संपादित टि. म. वि. पुणे.
- जैन हिरालाल, जैन शिलालेख संग्रह भाग 1 मुंबई.
- डांगे सिंधु, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, कॉंटिनेंटल प्रकाशन.
- देव. शां. भा. जैन धर्माचा विकास व प्रचार.
- नाहटा अगरचंद, बिकानेर जैन लेख संग्रह कलकत्ता.
- पाटील. बा. भा. दक्षिण भारतातील जैन व जैन धर्म यांचा संक्षिप्त इतिहास.
- पाठक अरुणचंद्र, किल्ले कंधार व राष्ट्रकूट कालीन शिल्प वैभव.
- विजयामुर्ति. श्री. प. जैन शिलालेख संग्रह भाग 2 व 3, मुंबई.
- देव. शां. भा. महाराष्ट्र व गोवे शिलालेख – ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची.

हिंदी ग्रंथ

- जैन. के. सी., जैन धर्म का इतिहास
- जैन. के. सी. भारतीय दिगंबर जैन अभिलेख 2001.

अप्रकाशित साधने

- राठोर राघवेंद्र सिंह, राष्ट्रकूट नरेश और उनका युग प्रबंध जीवाजी विद्यापीठ ग्वाल्हेर 2015

WEBSITE

- **Www.idjo.org**
- **Www.asi.in**

इंग्रजी साधने

- Altekar. A. S. The rashtrkutas and their times. Oriental book agency.
- Ayyangar ramaswami, Jainism in sauth Indian Jainism.
- Dev. S. B. Studies in Jaina monastic life.
- Desai, P. B. Jainism in India some epigraphs 1957 solapur.
- Gopal. B. R. The rashtrkutas of malkhed, geeta book house maisur.
- Joseph. Jainism in sauth India.
- Jain jyoti prasad. The Jaina sources of history of ancient India 100 BC To 900AD.
- Nahar puranchand. Jainism inscription Vol 1, 2, 3 Calcutta 1918.
- Nagrajaya Hampa. History of rashtrkuta malkhed and Jainism, vol 1St to 6th.
- Reu. B. N. History of rashtrkutas, jaipur publication.
- Shah. Chimanlal. Jainism in North India 1933 London.
- Warren. Herbert, Jainism

: संशोधक:

विनायक दिलीप हिरे

: संशोधन मार्गदर्शक:

डॉ. अनिल मुरलीधर कठारे

प्रोफेसर, संचालक व विभाग प्रमुख

पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र

श्री शिवाजी कॉलेज, कंधार

ता. कंधार जि. नांदेड